File No.SMC-31011(19)/119/2021-SMC-HEALTH

जाहिरात सन २०२२-२३

# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

## आरोग्य विभाग, सो.म.पा.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१**

**सामान्य प्रशासन विभाग**

**E- ३६४३४**

जाक्र.सआस/NUHM भरती २२-२३/आस्था-२/५४८ सोलापूर दि. १० /११/२०२२

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) , आरोग्य विभाग, सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथून सोलापूर शहरातील विविध आरोग्य केंद्रास्तरावर राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेतील ०५ संवर्गातील ३७ पदांची पदभरती प्रक्रिया कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर राबविण्यात येत असून खालील तक्यात नमूद पदासाठी पात्र ठरत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | रिक्त पद संख्या | पदासाठी शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | पदांचे मानधन | सामाजिक आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी यु.पी.एच.सी. व प्रसुतीगृहकरीता (पुर्ण वेळ) | ४ | MBBS | ७० वर्षांपर्यंत | ६०,०००/- | अनु.जमाती - १<br>भ.ज.(ब) - १<br>ईडब्लूएस - २ |
| २ | स्त्री रोग व प्रसुती तज्ञ | १ | (MD / DNB/ DGO) in Gynaecology & Obstetrics | ७० वर्षांपर्यंत | ७५,०००/- | अ.जाती - १ |
| ३ | वैद्यकिय अधिकारी यु.पी.एच.सी. करीता (अर्धवेळ) | ५ | • (MD / DNB/DCH) in Pediatrics - ५ | ७० वर्षांपर्यंत | प्रति भेटीसाठी २०००/- (जास्ती जास्त- ३०,०००/- प्र.माह) | खुला - ५ (अनुशेष लागू नाही) |
| | एकूण | १० | | | | |

**शर्ती व अटी :-**

१. वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन, ११ महिने कालावधीसाठी नियुक्ती राहिल. तथापी आधी सदरील पद नामंजूर/ रद्द झाल्यास किंवा सन २०२२-२३ करीता मंजूर अप्राप्त राहिल्यास वरील सर्व पदांची सेवा दिनांक ३१/०३/२०२३ रोजी आपोआप संपुष्टात येईल. परंतू वरील पदे सन **२०२३-२४** करिता मंजूर झाल्यास ११ महिन्याकरिता नियुक्ती राहिल.

२२/११/२२

२. उमेदवारांकडून **दिनांक १४/११/२०२२ ते दिनांक२१/११/२०२२** या कालावधीत कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळून सकाळी १०.०० ते दुपारी ०५.०० या वेळेतच अर्ज स्विकृती करण्यात येईल. अर्ज स्विकृती ही आस्थापना-४, सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर या ठिकाणी करण्यात येईल. उमेदवारांस एकापेक्षा जास्त पदाकरिता अर्ज सादर करायचा असल्यास, प्रत्येक पदाकरिता स्वतंत्रपणे अर्ज सादर करावा. परंतू वेळप्रसंगी एकाच वेळी मुलाखत/परिक्षा घेतली गेल्यास कोणत्या तरी एका पदाकरीता उपस्थित रहावे लागेल. ज्यास उपस्थित राहील त्या पदाकरिता संबधित उमेदवार ग्राहय धरला जाईल.

३. उपरोक्त तक्त्यातील पदाकरीता दर्शविण्यात आलेल्या पदाकरीता त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद अन्य उपलब्ध पात्र उमेदवारांतून तात्पुरती नियुक्ती करून भरण्यात येईल.

४. पदभरती प्रक्रियेकरिता प्रत्येक अर्जाकरिता अराखीव प्रवर्गातील उमेदवारांकरिता रु.१५०/- (अक्षरी रक्कम रु. एकशे पन्नास फक्त) व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना रु.१००/- (अक्षरी रक्कम रु. शंभर रुपये फक्त) इतके शुल्क आकारण्यात येत असून,सदरील शुल्क हे डिमांड ड्राफट (Demand Draft) स्वरुपात स्विकारण्यात येईल. सदरील शुल्क हे नापरतावा (Non Refundable) असून, उमेदवारांनी डिमांड ड्राफट हे **(Intergrated Health & Family WelFare Society Solapur)** या संपूर्ण नावे असावा आणि अर्जावर एकदम वरच्या बाजूस जोडण्यात यावा.डिमांड ड्राफ्टच्या मागील बाजूस उमेदवाराने त्यांचे संपूर्ण नाव,अर्ज सादर केलेल्या पदांचे नाव,पद क्रमांक टाकावा,जर डिमांड ड्राफ्ट च्या नावामध्ये चूक आढळल्यास अथवा खराब असल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज पदभरतीच्या पुढील प्रक्रियेकरीता ग्राहय धरला जाणार नाही यांची उमेदवारांनी जाणीवपूर्वक नोंद घेण्यात यावी.

५. वरील सर्व पदे ही कंत्राटी, तात्पुरत्या स्वरूपाची व एकत्रित मानधनावरील असल्याने,सदर पदाकरीता शासकीय सेवेनुसार असलेले नियम,अटी य शर्ती या बाबतचा हक्क व दावा राहणार नाही. त्याचसोबत यावरील सर्व पदाकरीता शासनाकडील सेवा नियम लागू होत नाही. शासकीय सेवाप्रवेश लागू राहणार नाही.

६. सर्व पदाकरीता उमेदवारानी अर्ज सादर करताना त्या पदासाठी आवश्यक असलेली प्रथम विहीत नमुन्यातील अर्ज, १० वी गुणपत्रक आणि सनद, १२ वी गुणपत्रक आणि सनद,पदवीचे गुणपत्रक (१ ले वर्ष ते अंतिम वर्ष - सर्व Attempt सह), पदवी प्रमाणपत्र (Convocation Certificate), अतिरिक्त शैक्षणिक अर्हताचे प्रमाणपत्र व त्यांना लागू असल्यास संबधित वैद्यकिय परिषदेकडील वैद्य असलेली नोंदणी, मुदत संपलेली असल्यास नुतनीकरण प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणून (शाळा सोडल्याचा दाखला,जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित/स्वसाक्षांकित) करून जोडावीत. ज्या प्रमाणपत्रामध्ये Grading System नुसार मार्क असतील त्यांनी संबधित प्रमाणपत्रामागील Grade Card झेरॉक्स अर्जासोबत जोडण्यात यावी (विशेषत: CGPA/SGPA), अर्जासह जोडलेल्या सर्व कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक टाकण्यात यावेत.अर्ज सादर केल्याची पोहोच घेणेकरीता अर्जाच्या वरील पृष्ठभागाची झेरॉक्स घेऊन येणे.

७. वर नमूद पदाकरीता नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेसोबत संबधित वैद्यकीय परिषदेकडील वैध असलेली नोंदणी अर्जासोबत सादर करण्यात यावी. त्याच सोबत अतिरिक्त शिक्षणाची नोंद ही परिषदेकडे केलेली असावी. परिषदेकडील Smart Card उपलब्ध असल्यास त्याची झेरॉक्य प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

८. उमेदवारांची अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानूसार असलेल्या प्रवर्ग आणि बँकेचे नाव व डिमांड ड्राफ्ट क्रमांक अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावे.

९. उपरोक्त पदभरतीबाबत असलेल्या सर्व सुचना (तात्पुरते पात्र/अपात्र, हरकती स्विकारणे, अंतिम पात्र/अपात्र, मुलाखती किंवा लेखी परिक्षेस निवड झालेल्यांची यादी, मुलाखत अथवा लेखी परिक्षा वेळापत्रक व इतर बाबी) हया सोलापूर महानगरपालिका, सोलापुर चे अधिकृत संकेतस्थळ http://www.solapurcorporation.gov.in वर प्रसिध्द करण्यात येतील. याबाबत उमेदवारांस कोणतेही सुचना दूरध्वनी निरोप,SMS, Email केला जाणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य राहील.

१०. सदर रिक्त पदांची संख्य, शैक्षणिक अर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण,नियुक्ती ठिकाणामध्ये बदल, नमूद केलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन पदभरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार आयुक्त तथा अध्यक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, पदभरती निवड समिती सोलापूर यांनी राखुन ठेवलेले आहेत. /

११. सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्ज न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेले पात्रता आवश्यकतेनुसार शिथिल करण्यात येईल.

१२. तसेच आवश्यक त्या संख्येमध्ये राखीव प्रवर्गाचे उमेदवार आवश्यक प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास, सदर रिक्त पदांच्या पदभरतीची आवश्यकता लक्षात घेता अराखीव प्रवर्गातील प्रतिक्षाधीन उमेदवारास राखीव प्रवर्गाकरीता

तात्पुरत्या स्वरुपामध्ये नियूक्ती देण्यात येईल. (सदरची अट ही ज्या पदाकरिता खुला प्रवर्गाच्या जागा आहेत तिथेच लागू राहिल)

१३. राष्ट्रीय आरोग्य अभियान मधील सर्व स्तरावरील पदे ही निव्वळ कंत्राटी व तात्पुरूत्या स्वरुपाची असल्याने, सद्यस्थितीत बदली बाबत कोणतेही धोरण नसल्याने उमेदवारांस नियुक्ती दिल्यानंतर पदस्थापनेत बदल करुन दिला जाणार नाही यांचे उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१४. राखीव प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिर्वाय आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

१५. ठराविक प्रमाणपत्र सादरीकरण करणेकामी सेतू कार्यालयाकडील पावती अर्जासोबत सादर केलेली असल्यास, सदरील उमेदवारांचे अर्ज तात्पुरत्या पात्र/अपात्र यादीमध्ये अपात्र ठरविण्यात येतील. परंतू उमेदवारांनी हरकती वेळेस सदरील सेतु कार्यालयाकडील प्रमाणपत्र सादर केल्यास संबधित उमेदवारांचे अर्ज अंतिम पात्र/अपात्र यादी मध्ये पात्र ठरविण्यात येतील.

१६. वैद्यकिय परिषदेकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणतेही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापि वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१७. अर्जाचा नमूना हा सोलापूर महानगरपालिका च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून सदरील अर्जाचा नमुना मध्ये अर्ज नसल्यास उमेदवारांचा अर्ज स्विकारला जाणार नाही. यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. (स्वत: टंकलिखित केलेले,नमुन्यामध्ये बदल असल्यास अथवा इतर अर्ज विक्री केंद्राच्या नावानुसार असलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.)

१८. उमेदवारांकडून अर्धवट, अपुर्ण वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केला असल्यास,संबंधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वीपणे संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहिल. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरूपाची तक्रार स्विकारली जाणार नाही. अर्ज भरणेकामी काही अडचणी असल्यास कार्यालयास सक्षम भेट देऊन विचारणा करण्यात यावी.

१९. उमेदवार हा संबंधित पदासाठी शाररीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. तसेच उमेदवारांविरूध्द कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा झालेला नसावा.

२०. केंद्र सरकार अथवा राज्य शासनाकडून संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवारांस कोणतीही पुर्व सुचना न देता संबंधित उमेदवारांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल. यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक असणार नाही. अथवा १ महिन्याची पुर्व नोटीस दिली जाणार नाही

२१. उमेदवाराने अर्ज सादर केलेल्या पदांशी निगडीत संबंधित उमेदवारांस शासकिय कार्यालयाकडील अनुभव असल्यास सदरील अनुभव ग्राहय धरण्यात येऊन त्याबाबतचे गुण देण्यात येईल यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. खाजगी क्षेत्रातील सदर पदाशी निगडीत अथवा इतर क्षेत्रातील पदाशी निगडीत नसलेला अनुभव असल्यास सदरील अनुभव हा ग्राहय धरला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

२२. वयाचा पुरावा म्हणून उमेदवारांने शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (सनद) सादर करावी ज्यावरून उमेदवारांची जन्मतारीख ग्राहय धरणे सोईस्कर होईल अशा पध्दतीचे प्रमाणपत्र सादर करावे.

२३. उमेदवारांनी वर नमूद केलेल्या कालावधीमध्ये कार्यालयीन दिवशी व वेळेत केवळ व्यक्तीश: उपस्थित राहून अर्ज सादर करण्यात यावेत. नमूद मुदतीत आलेल्या अर्जाचा विचार केला जाईल. याबाबत उमेदवारांकडून कोणत्या स्वरूपाची तक्रार अथवा त्रयस्थामार्फत दबाव तंत्राचा वापर करण्याचा प्रयत्न करू नये.

२४. अर्जा सोबत नमूद करण्यात येत असलेला मोबाईल क्रमांक हा संपुर्ण पदभरती प्रक्रिया होई पर्यंत चालु स्थितीत राहण्याची दक्षता उमेदवारांनी घेण्यात यावी.

**(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)**
आयुक्त तथा अध्यक्ष,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, पदभरती निवड समिती सोलापूर.

Signed by P.sivasankar
Date: 09-11-2022 19:22:46
Reason: Approved

Birajdar EST-2 New Inn